भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय नववा , भाग पहिला

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय नववा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय नववा

राजविद्याराजगुह्ययोग

अवधान एकवेळ दीजे । मग सर्व सुखासी प्राप्त होईजे । हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड ऐका ॥१॥
प्रौढी न मी सांगतसे । बापहो तुम्ही सर्वज्ञच असे । परि द्यावे अवधान असे । विनवी तुम्हा ॥२॥
होई सकल लाडांची पूर्ती । सर्व मनोरथे पूर्णत्वास जाती । जर ऐश्वर्यवंत भेटती । तुम्हा जैसे ॥३॥
तुमच्या कृपादृष्टी कारणे । मनी आनंदाचे बहरणे । मग रहाणे ते प्रसन्नपणे । आपुल्याच ठायी ॥४॥
प्रभू तुम्ही डोह सुखामृताचे । घडो सेवन मज तयाचे । भय जर धरले तुमच्या सलगीचे । मग उपयोग नाही ॥५॥
बोबडे ते बोल बोलणे । अडखळत पाऊल टाकणे । मातेस रिझवणे । बालकाने जैसे ॥६॥
तुमच्या प्रेमाची मजसी । आशा असे मानसी । म्हणून सलगी ऐसी । करू पाही ॥७॥
मी बालक योग्यतेवीण । तुम्ही सरस्वतीपुत्र जाणते जन । सरस्वतीपुत्रास शिकवण । न लगेच की ॥८॥
काजव्याने काजवाच रहावं । सूर्यासमोर न तयाचा टिकाव । अमृत ताटात वाढावं । ऐसे पक्वान्न कोठे ॥९॥
शीतल चंद्रास पंखा करणे । की नादास नाद ऐकविणे । वा दागिने दागिन्यास घालणे । हे कैसे होई ॥१०॥
सुगंध का कधी वास घेई । सागर का स्नाना जाई । गगनासी सामावून घेई । ऐसा विस्तार कोठे ॥११॥
तैसे तुम्हा अवधान जडो । तुम्ही चिंताल ते घडो । तुम्हासी सदैव आवडो । ऐसे वक्तृत्व कोठे ॥१२॥
जो विश्वासी प्रकाश देतो । तयाची आपण आरती करतो । आणि नाही का अर्घ्य देतो । समुद्रासी ॥१३॥
प्रभू तुम्ही शिवाचे अवतार । मी दुबळा ज्ञानेश्वर । निरगुडी पाल्याचा करावा स्वीकार । बेल म्हणूनी ॥१४॥
बालकाने बापा सोबत जेवावे । मग बापानेच तया हातून खावे । करितसे बापही मग प्रेमभावे । तोंड पुढे ॥१५॥
तैसे मी तुम्हाप्रति । बडबड करी बालमती । प्रेमाची ही जाती । तैसीच होय ॥१६॥
मी तुम्हास माझे जाणले । मज तुम्ही प्रेमे अलिंगले । म्हणून मी सलगीने नमस्कारिले । आभार तुमचे ॥१७॥
वासरू गाईचे स्तनासी झटे । मग पान्हा अधिकच फुटे । प्रेम अधिकच दाटे । आपुलेपणे ॥१८॥
म्हणून मज लेकराच्या बोले । तुमचे कृपाळूपण जागले । मजसी पहा ते जाणवले । म्हणून बोलतो ॥१९॥
चांदणे का कधी आढीत पिकते । वाऱ्यास का कोणी गती देते । कोणी गगन का कवेत घेते । सांगा तुम्ही ॥२०॥
पाणी का पातळ होते । कधी लोणी का घुसळावे लागते । तैसे कधीच शब्दी न येते । ते परब्रह्म ॥२१॥
ते शब्दब्रह्म ऐसे । जेथे शब्दाचे न काही चालतसे । ते मराठीत सांगू कसे । प्रश्न मज पडला ॥२२॥
धाक जरी मजला असा । परि माझ्या मनी एक आशा । दावून भवचक्राचा फासा । प्रेरित तुम्हा करावे ॥२३॥
शीतल जे चंद्राहून । जीवनदायी अमृताहून । मनोरथ करावे माझे पूर्ण । देऊन अवधान ॥२४॥
त्या अवधाना कारणे । प्रज्ञेचे होई प्रकटणे । अन्यथा ज्ञान कोंभाचे सुकणे । जर असजग तुम्ही ॥२५॥
सहज प्रकटेल ज्ञान । जरी दिले तुम्ही अवधान । व्हाल मग प्रज्ञावान । गुह्य ते जाणता ॥२६॥
शब्दामागील अर्थ समजो । अभिप्रायातील अभिप्राय उमजो । भावविश्व ते सजो । मनी तुमच्या ॥२७॥
हा संबंध जर घडला । मग प्रज्ञेचा दीप लागला । आणि जर श्रोता न एकाग्रला । मग संपले सगळे ॥२८॥
चंद्रकांत मण्यास पाझरण्याची योग्यता । परि ती चंद्राचीच सत्ता । तैसे वक्ता न होई वक्ता । श्रोतेवीण ॥२९॥
आम्हास गोड करावे । हे तांदळाने का विनवावे । कळसूत्री बाहुल्यांनी का प्रार्थावे । सूत्रधारा कधी ॥३०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तो बाहुल्यांसाठी न नाचवी । आपुले कौशल्य प्रदर्शवी । विनंतीची ती उठाठेवी । मग कशासाठी ॥३१॥
श्री गुरू म्हणाले । तू सांगितले ते सर्व पावले । आता नारायणे जे निरुपले । ते सांग आम्हा ॥३२॥
श्री गुरूचे भाषण ऐकून । ज्ञानदेव गेले उल्हासून । मग जी जी म्हणून । बोलते झाले ॥३३॥

श्री भगवानुवाच

जाणता अतिगूढ अध्यात्म सार । जे नेई भवचक्राच्या पार । जिवाचा मग उद्धार । आपोआप ॥३४॥
जे जाणता जीवभाव तुटे । ऐसे ते रहस्य गोमटे । कैसे सांगेन ते चोखटे । शंका न घेई ॥३५॥
महान तू प्रज्ञावंत । अपार असा श्रद्धावंत । आज्ञाधारक मूर्तिमंत । अर्जुना तू ॥३६॥
जीवभाव भ्रम तो खुंटे । जेव्हा शब्दातीत ते प्रकटे । आत्मतत्त्व ते चोखटे । मग आकळे मनी ॥३७॥
स्तनी असे ते दूध गोड । स्तनासी न तयाची चाड । परि सेवणाऱ्याचे पुरवती लाड । आपोआप ॥३८॥
कणगीतून बीज काढिले । मग भूमीसी पेरिले । ते काय मग वाया गेले । कधी अर्जुना ॥३९॥
जयाचे मन शुद्ध नि सुंदर । तो होई भवचक्राच्या पार । ऐकता ते अध्यात्मसार । आपोआप ॥४०॥
युक्त अशा या गुणांनी । तुजवाचून नाही अन्य कोणी । अध्यात्म रहस्य म्हणोनी । सांगतसे तुजला ॥४१॥
कौतुक किती सांगू या ज्ञानाचे । वारंवार प्रतिपादन अतिरेकाचे । परि वर्णन करीन ज्ञानाचे । विज्ञानासह ॥४२॥
अस्तित्वी सत्य असत्याची मिसळणं । असत्य घेता जाणून । मग उरते सत्य ज्ञान । आपोआप ॥४३॥
केवळ चोचीच्या बळे । राजहंस करी पाणी दुधावेगळे । तैसे विज्ञानासहित ज्ञान सगळे । आकळेल तुजला ॥४४॥
धान्य उफणता वाऱ्यावर । कोंडा उडून जाये दूरवर । मग धान्यराशीचा संवर । तेथे होई ॥४५॥
ऐसे होता आत्मज्ञान खास । जीवपणाचा विरतसे भास । मग आत्मतत्त्वाचा विलास । विश्वाठायी ॥४६॥
हे ज्ञान जेथे प्रकटले । तया गुरू आचार्य संबोधिले । ऐसे ज्ञान हे चांगले । पवित्र अर्जुना ॥४७॥
हे ज्ञानच निजस्वरूप । ऐसे ज्ञान ते अमूप । विश्व भासे मग स्वस्वरूप । अंतरंगी ॥४८॥
गुरुमुखातून प्रकटे ऐसे वाटे । जे अंतरीच असे ते भेटे । कामना विरता प्रकटे । आपोआप ॥४९॥
तैसे प्रथम कामना त्यागणे । नि मग ज्ञानाची भेट घेणे । ऐसे ज्ञानाचे अनुभवणे । घडे अर्जुना ॥५०॥
सर्व भोग या तीरी सोडता । मन इच्छा त्या सांडता । प्रकटते ती ब्रह्ममयता । आपोआप ॥५१॥
काय स्वरूप वर्णू परब्रह्माचे । प्राप्त होता जे न हारपायचे । जे संपणे अनुभवित्याचे । शून्याठायी ॥५२॥
अर्जुना तू तार्किका । घेशील एक शंका । सर्व आशा या लोका । का न प्राप्ति तियेची ॥५३॥
जया धनसंपत्ती आवडी । त्यासाठी आगीतही घालती उडी । ते स्वरूपसुखाची गोडी । सोडतील कशी ॥५४॥
हे ज्ञान पवित्र आणि रम्य । ध्यान समजेलाच गम्य । जयाचे अमृताशी साम्य । त्यासी प्राप्त तू होईजे ॥५५॥
ऐसे हे जे सुख सांप्रत । का न जनासी न होय प्राप्त । शंका उठेल तुझ्या मनात । परि त्याग शंका ॥५६॥
कासेतील दूध पवित्र आणि गोड । केवळ त्वचेच्या पदराआड । परि ते अव्हेरून गोचीड । रक्त पिती ॥५७॥
कमलकंद आणि बेडुके ती । एकाच ठिकाणी रहाती । परि पराग भ्रमर सेविती । नि बेडूक चिखल ॥५८॥
ना तरी दुर्दैवाच्या घरी । मोहरा गाडल्या असती सहस्त्रावरी । परि तेथे बैसोनी उपवास करी । दुर्दैवी तो ॥५९॥
तैसा हृदयामध्ये मी रामु । सर्व सुखाचा तो आरामु । परि भ्रांतासी आवडे कामु । विषयलंपट जो ॥६०॥
मृगजळ देखोनी अलोट । थुंकी अमृताचा घोट । अव्हेरिला परिसाचा तो गोट । शिंपल्यासाठी ॥६१॥
तैसे मी माझे कारणे । मजसी न घडे तयाचे पावणे । तया नशिबी जन्मणे आणि मरणे । अव्याहत ॥६२॥
एरव्ही मी तरी कैसा । नित्य चिरंतन भानु आपैसा । अनित्य त्या वाणी जैसा । नाही अर्जुना ॥६३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

माझाच विस्तार हे जग अवघे ।वेगळे नसतीच ते दोघे ।दूध मुरून दही लागे ।तैसे विश्वप्रकटन माझे ठायी ॥६४॥
बीजाचाच वृक्ष होणे । वा सुवर्णाचे अलंकार बनणे । तैसे माझे ठायी विश्व प्रकटणे । जाण बा अर्जुना ॥६५॥
विश्व चैतन्याचेच थिजणे । मग जगत बनून प्रकटणे । निराकारी आकार घेणे । ही माझीच माया ॥६६॥
सागरी जसे फेसाचे असणे । तैसे असीमाचे सीमित होणे । मग विश्व होऊन नांदणे । ही माझीच लीला ॥६७॥
त्या फेसास पाहू जाता । पाण्याचा न दिसे थांगपत्ता । स्वप्नातील ती बहुभूमिकता । न जागेपणी ॥६८॥
तैसी भुते भासती मजठायी । परि त्यांना माझी जाणीव नाही । सांगितले हे मागील अध्यायी । आठव जरा ॥६९॥
म्हणून न लावता लांबण । मी थांबवतो हे भाषण । परि तुझे ते अवधान । प्रवेशो मजठायी ॥७०॥
प्रकृती असे माझे व्यक्तरूप । संपता कल्पना प्रकटे मी अरूप । रूप आणि अरूप । भिन्न नाही ॥७१॥
परंतु संकल्पाचे कारणे । जीव बुद्धीचे प्रकटणे । मी-माझेपणाचे जागणे । तेचि द्वैत ॥७२॥
हे संकल्प जेधवा लोपती । मग प्रकटे अद्वैताची प्रतिती । रज्जुठायी सर्पाची ती भीती । लोप पावे ॥७३॥
ऐरवी मृत्तिका ती स्वयंभ । काय रांजण मडक्याचे निघती कोंभ । ते तर कुंभारबुद्धीचे अंग । आकार तैसा ॥७४॥
जैसे सागराचे ठिकाणी । नसती लाटांच्या त्या खाणी । परि लाटांची ती दाटणी । वाऱ्याकारणे ॥७५॥
जसे कापसाच्या पोटी । नसे कापडाची गोष्टी । परि होतसे नेसणाऱ्यासाठी । कापूसच कापड ॥७६॥
सोने जरी बने दागिने । परि सोनेपणास न ये उणे । अलंकाराचे ते भासणे । घालणाऱ्यासाठी ॥७७॥
गिरिकंदरी प्रतिध्वनीचे नांदणे । आरसी प्रतिमेचे उमटणे । ते आपलेच की असणे । आपल्याकारणे ॥७८॥
तैसे माझ्या निर्विकल्प स्वरूपी । जो भूतभावना विकल्पी । तयाच्या त्या संकल्पी । भासणे भासाचे ॥७९॥
जे सर्व कल्पना सांडती । तेथे भासांची होई समाप्ती । संपता द्वैताची दुर्गती । अद्वैत प्रकटन ॥८०॥
जे स्वत: भोवतीच फिरती । तयाठायी भासाची निर्मिती । तैसे भ्रमवून आपली मती । गमती भुते ॥८१॥
म्हणून कल्पना त्या सांडता । नुरे मी आणि विश्व ही भिन्नता । द्वैत ते विरता । आत्मज्ञान ॥८२॥
मग भुतांसी मी धारण करी । वा भुते मजठायी वास करी । ऐसी कल्पनांची चवरी । नुरेच तेथे ॥८३॥
म्हणून हे अर्जुना प्रियोत्तमा । मीच विश्व नि विश्वात्मा । या लटिक्या भूतग्रामा । मीच कारण ॥८४॥
सूर्यकिरणांच्या कारणे । मृगजळाचे ते भासणे । तैसे सर्व अस्तित्वाचे असणे । माझ्याठायी ॥८५॥
मीच अस्तित्वाचा निर्माता । मी आणि अस्तित्व ही अभिन्नता । जैसी सूर्याशी किरणांची एकता । तैसेच हे ॥८६॥
ऐसे माझे ऐश्वर्यपण । सांगितले तुवा लागून । त्या अभिन्नतेस तू जाणून । सुखिया होसी ॥८७॥
सर्व अस्तित्व प्रकटले मजपासून । अस्तित्व आणि मी अभिन्न । ऐसे होणे ज्ञान । मोक्षदायी ॥८८॥
गगन जेवढे भासे । तेवढाच गगनी पवन असे । हालविल्या वेगळा दिसे । एरवी गगन पवन अभिन्न ॥८९॥
तैसे कल्पिता आभास होई । मग अस्तित्व प्रकटन मजठायी । जे मन निर्विकल्प होई । तया ज्ञान माझे ॥९०॥
म्हणून असणे आणि नसणे । दोन्ही कल्पनांकारणे । कल्पनेकारणे लोपणे प्रकटणे । माया अर्जुना ॥९१॥
कल्पना त्या सरता । प्राप्त होशील अद्वैता । मग जगताशी ती एकता । प्रकटे अंतरंगी ॥९२॥
ऐसा बोध प्रकटता । अस्तित्वाशी जी एकरूपता । मग अस्तित्वाचा राबता । तुझेच ठायी ॥९३॥
ऐसा अद्वैत ज्ञानाचा उदय । जो द्वैतभावाचा लय । कल्पनांचा संपता प्रलय । मुक्ती अर्जुना ॥९४॥
आणि जर अर्जुना । न सांडली ती कल्पना । मग निखळ ज्ञाना । गाठ नाही ॥९५॥
मीपणाची झोप मोडो । स्वरूप बोधाचे कवाड उघडो । गाठ ती तुझी पडो । तुझी तुझ्याशीच ॥९६॥
म्हणून हे अर्जुना । प्राप्त होऊन अवधाना । सांडून मनइंद्रियांच्या बंधना । मज प्राप्त हो ॥९७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जिये म्हणती अर्जुना प्रकृती। ती असे दोन स्तरावरती। व्यक्त आणि अव्यक्त ही गती। त्या प्रकृतीठायी ॥९८॥
हा प्रकृती विषय आघवा। मागेच तुला कथिला पांडवा।पुन्हा पुनरावृत्तीच्या गावा। जावे कशाला ॥९९॥
महाकल्पाच्या अंती। सर्व माझ्यात सामावती। सर्व भुते लय पावती। माझ्याच ठायी ॥१००॥
उन्हाळा होता प्रकट। गवत मग बीजासकट। करुनी भूमीसी लगट। गुप्त होई ॥१०१॥
अंत वर्षाऋतूचा होता। शरद ऋतूचा समय येता। होई ढगांची ती समरसता। गगनाठायी ॥१०२॥
जैसे आकाशाच्या पोकळीत। वायू लपे होऊनी निवांत। वा लाटा जशा विरतात। सागराठायी ॥१०३॥
जैसे वेळ येता जागृतीची। मावळे अवस्था स्वप्नाची। तैसे एकता व्यक्त अव्यक्ताची। कल्पांत काळी ॥१०४॥
कल्पाच्या आरंभी मग। मीच करी सृष्टीचा आरंभ। अस्तित्वाचा ऐसा समारंभ। माझेच ठायी ॥१०५॥
ऐसी ही प्रकृती। जी माझीच निर्मिती। जैसी तंतूचिया गुंती। निर्मिती वस्त्रांची ॥१०६॥
तैसे या पंचभुतांच्या आधारे। मीच निर्मिले विश्व सारे। म्हणून जगत आले आकारे। मायेठायी ॥१०७॥
जैसे विरजणाचे कारणे। दूधचि दही होणे। तैसे पंचभुताकारणे। प्रकटन अस्तित्वाचे ॥१०८॥
बीज जलाची जवळीक होता। मग फांद्या-फुलांचा राबता। तैसी माझी सत्ता। विश्वाठायी ॥१०९॥
म्हणे राजा नगर उभारे। परि सत्य ते का असे रे। कधी काय शिणती कारे। हात तयाचे ॥११०॥
हे प्रकृती संचलन मजकारणे। जैसे स्वप्नी जयाचे असणे। त्याचेच जागृतीत प्रवेशणे। तैसेच हे सारे ॥१११॥
स्वप्नातून जागृतीत येता। काय पाय दुखती पांडुसुता। की स्वप्नी असता। होई प्रवास ॥११२॥
या सर्वाचा सारांश काय। हे जे प्रकृती प्रकटन होय। ते स्वयंभूच होय। ऐसाची अर्थ ॥११३॥
जैसे राजाचे सत्ताकारणे। राज्याचे व्यवस्थित चालणे। तैसे माझे कारणे। संचालन प्रकृतीचे ॥११४॥
पौर्णिमेच्या त्या दिवशी। समुद्र येत असे भरतीशी। त्यासाठी का चंद्रासी। पडती कष्ट ॥११५॥
लोह जाता चुंबका जवळे। लोह आपसूक वळवळे। जे घडे चुंबकत्वामुळे। न करता काही ॥११६॥
किंबहुना या उपरता। माझा प्रकृतीशी संबंध येता। भूतसृष्टीची ती आविष्कारता। आपोआप ॥११७॥
जैसे भूमीच्या कारणे। वेली वृक्षांचे बहरणे। तैसे सृष्टीचे हे प्रकटणे। प्रकृतीठायी ॥११८॥
ऐसे ते गोसावीपण। असो वृद्धत्व, तारुण्य वा बालपण। असते का आकाशाची आठवण। आकाशा कधी ॥११९॥
निद्रा कारण स्वप्नाचे। कारण प्रकृती तैसे सृष्टीचे। प्रकटणे सर्वही या भुतांचे। प्रकृतीठायी ॥१२०॥
स्थावर वा जंगम। स्थूल वा सूक्ष्म। ऐसे हे भूतग्राम। प्रकृतीच ती ॥१२१॥
ऐसे हे भुतांचे सृजन। वा सृष्टीचे प्रतिपालन। हे अवघेचि कार्यकारण। प्रकृतीठायी ॥१२२॥
जळी प्रतिबिंब उमटे चांदण्याचे। नसे कर्तृत्व ते चंद्राचे। तैसे जंजाळ प्रकृती कर्माचे। न स्पर्शे मज ॥१२३॥
सागराने सोडता सीमा। बांध मिठाचा न ये कामा। तैसा हा कर्माचा महिमा। आपोआप ॥१२४॥
धुराचे ते लोट। कधी का अडविती वादळाची वाट। अंधाराचा तो थाट। नसे सूर्यबिंबी ॥१२५॥
पर्जन्याची ती धारा। स्पर्शेच ना कधी पर्वताच्या गाभारा। तैसे कर्म प्रकृतीचा पसारा। अबाधित ॥१२६॥
ऐसी ही प्रकृती विकारी। मीच ती अवधारी। तेथे मी उदासीनाचियापरी। सर्वत्र गा ॥१२७॥
जैसा दिव्याचा तो प्रकाश। तेथे नसे राग वा द्वेष। प्रकाशातील कर्म अकर्माचा दोष। न लिंपे तया ॥१२८॥
दीप जैसा केवळ साक्षीभूत। गृहव्यवहार प्रवृत्तीरहित। तैसा प्रकृतीठायी मी अनासक्त। जगती असे ॥१२९॥
एकचि माझे सांगणे। काय सांगू बहूपणे। जाण ते तू सजगतेने। बा अर्जुना ॥१३०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सृष्टिकार्य निसर्गाचे । त्यास निमित्त सूर्याचे । तैसे या सृष्टीचे । निमित्त मी ॥१३१॥
या प्रकृतीचे मी अधिष्ठान । म्हणून चराचर जाहले उत्पन्न । सर्वांचे मूळ-कारण । मीच अर्जुना ॥१३२॥
माझ्यापासून सर्व निर्मिती । परि भुते मला न जाणती । ऐसी ही विचित्र स्थिती । या जगती ॥१३३॥
मला भुतांसी तादात्म्य नसे । भुतांनाही माझी जाणीव नसे । अस्तित्वाचे हे रहस्य ऐसे । जाण तू अर्जुना ॥१३४॥
हे रहस्य माझे गूढ । मी दाविले तुज उघड । तू तादात्म्य मनइंद्रियांसी तोड । आकळण्या रहस्य ॥१३५॥
जोवरी हे वर्म न ये हाता । तोवरी न माझे ज्ञान तत्त्वत: । भुसा तो न त्यागता । धान्य नाही ॥१३६॥
मन बुद्धी शब्दा कारणे । ज्ञान कळले ऐसे वाटणे । परि मृगजळाच्या त्या ओलाव्याने । अंकुर नाही ॥१३७॥
तळ्यात जाळे ते फेकले । चंद्रबिंब भासे अडकले । जाळे तीरी जेव्हा काढले । ते बिंबविरहित ॥१३८॥
तैसे शब्द केवळ बोलघेवडे । जे येती प्रतितीच्या आडे । न संपता चौ वाचा चौघडे । ज्ञान नाही ॥१३९॥
त्याग या भवचक्रास । जर अंतरंगी मज भेटीची आस । या सिद्धांत रहस्यास । जाण अर्जुना ॥१४०॥
जर दृष्टी ग्रासिली काविळीने । मग चांदणे दिसे पिवळेपणे । तैसे अविद्याकारणे । भ्रांती मजविषयी ॥१४१॥
जसे फणफणता तापाने । दूध कडू विषपणे लागणे । तैसे पहाणे मला मनुष्यपणे । तो भ्रमच की ॥१४२॥
म्हणून हे धनंजया । न विसरशी मज अभिप्राया । स्थूल दृष्टी जातसे वाया । पहाण्या मज ॥१४३॥
जे स्थूल दृष्टीने देखती । ते मज प्रतितीस चुकती । स्वप्नी जे अमृत पिती । ते भ्रमित अर्जुना ॥१४४॥
ही स्थूल दृष्टी अत्यंत मूढ । तो भ्रम होता मग दृढ । मग येतसे तो आड । मज प्रतितीच्या ॥१४५॥
जैसे नक्षत्र प्रतिबिंबा कारणे । हंसाचा तो घात होणे । रत्नाच्या लोभाकारणे । सर्वनाश हंसाचा ॥१४६॥
मृगजळा जर गंगा मानले । मग फळ कधी का पावले । जैसे बाभळीस ते पूजिले । कल्पवृक्ष म्हणून ॥१४७॥
नीलमण्याचा समजून हार ।जर सर्पाचाच केला स्वीकार । ते वेचणे ती गार । रत्न म्हणूनी ॥१४८॥
निखाऱ्यास द्रव्य मानणे । नि पदरी ते बांधून घेणे । ते विहिरीत सिंहाचे कुदणे । न जाणता प्रतिबिंब ॥१४९॥
जे मज नामरुपी मानती । ते मज प्रतितीस चुकती । ते चंद्रबिंब धरिती । जळी जेवी ॥१५०॥
तैसा स्थूल दृष्टिवान । तो भाताची पेज पिऊन । म्हणे केले अमृताचे सेवन । ऐसा मूढ बुद्धी ॥१५१॥
तैसे स्थूलाकारी नाशिवंते । भरवसा बांधोनी चित्ते । पाही मज अविनाशाते । मग मी दिसे कैसा ॥१५२॥
न भेटे पश्चिम सागराचा तट । चालता पूर्व दिशेची वाट । वा कोंडा कांडिता तो सरलाट । न भेटे धान्य ॥१५३॥
तैसे या स्थूलाठायी । मी सूक्ष्मया भेटे काई । जो पाणी समजूनी फेस पीई । मग तहान जाईच ना ॥१५४॥
तैसे संमोहून स्वकल्पनेत । मज पाहती ते मूर्तीत । मानती जन्ममरणाचा उत्पात । मजठायी ॥१५५॥
मज अनामासी नाम । अक्रियावंतास कर्म । विदेहीस देहधर्म । आरोपिती ते ॥१५६॥
मज निराकारास आकार । निरुपाधिकास उपचार । मज विधि विवर्जीतास व्यव्हार । आचारादिक ॥१५७॥
मज वर्णहीना वर्ण । मज अचरणा चरण । नि गुणातीतासी गुण । कल्पिती ते ॥१५८॥
मज अहंरहिता मान । सर्व व्यापका स्थान । जैसे सेजे माजी वन । निदेला देखे ॥१५९॥
मज अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षुसी नेत्र । अगोत्रा ते गोत्र । मानती ते ॥१६०॥
मज अव्यक्तासी व्यक्ती । अनार्तासी आरती । स्वयंतृप्ता तृप्ती । करती ते गा ॥१६१॥
मज आवरणा प्रावर्ण । भूषणातीता भूषण । मज कारणरहिता कारण । देखती जे ॥१६२॥
मज अमूर्ताते मूर्त करिती । स्वयंभाते प्रतिष्ठिती । निरंतराते आव्हानीती । विसर्जिती गा ॥१६३॥
मी स्वत: स्वयंसिद्ध । म्हणती मज बाळ तरुण वृद्ध । मज एकरुपा संबंध । लावती सारे ॥१६४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मज अद्वैता द्वैतपण । अकर्त्यासी कर्तेपण । मज अभोक्तासी भोक्तेपण । देती अज्ञानपणे ॥१६५॥
मज अकुळाचे कुळ मानिती । मज नित्याचे निधने शिणती । असूनी मी सर्वांभुती । कल्पिती शत्रुमित्र ॥१६६॥
मी आनंदस्वरूप राम । म्हणती मजठायी काम । अवघाच मी निष्काम । बोलती नवस अज्ञानपणे ॥१६७॥
मी आत्मा एक चराचरी । म्हणती मी एकाचा पक्ष धरी । आणि कोपोनी दुसऱ्याते मारी । कल्पनाविलास ॥१६८॥
किंबहुना ऐसे समस्त । हे जे मनुष्यधर्म प्राकृत । तो मीच असे विपरीत । ज्ञान तयांचे ॥१६९॥
एक आकार मांडती । तया देव म्हणुनी भजती । मग आकार भंगता टाकती । नाही म्हणून ॥१७०॥
माते येणे प्रकारे । जाणती मनुष्य ऐसेनी आकारे । म्हणून अज्ञानाचे ते अंधारे । तयाठायी ॥१७१॥
अर्जुना वाया जन्म तयांचा । जैसा मेघ बिनपाण्याचा । भास तो तरंगांचा । मृगजळी ॥१७२॥
जसे मातीचे घोडेस्वार । वा गारुड्यांचे अलंकार । की गंधर्वनगरीचे आवार । आभास जो ॥१७३॥
जसा वृक्ष सावरीचा । ना दामाचा ना कामाचा । वा गळ्यासी स्तन शेळीचा । व्यर्थ अर्जुना ॥१७४॥
तैसे मूर्खांचे ते जिणे । आणि धिक तयांचे निपजणे । जसे सावरीस फळ येणे । अर्थहीन ॥१७५॥
मग जे काही ग्रंथ वाचले । ते मर्कटे नारळ तोडले । का आंधळ्या हाती पडले । मोती जसे ॥१७६॥
किंबहुना तयांची शास्त्रे । जशी कुमारी हाती दिधली शस्त्रे । वा अशुद्धा बीजमंत्रे । दिधली जैसी ॥१७७॥
तैसे तयांचे ते ज्ञान । जे असे आचरणावीण । म्हणून तयांचे अकल्याण । आपोआप ॥१७८॥
वाढता ते तमोगुण । सद्बुद्धी जाई संपून । मग अविवेक आचरण । घडे तेथे ॥१७९॥
ऐसे तमोगुणी अडकले । म्हणून चिंताग्रस्त झाले । आणि दु:खाच्या पडले । मुखामाजी ॥१८०॥
आशेच्या मागे लागून । स्वत:च्या मरणा ओढवून । सुखशांतीस लाथाडून । भ्रमले ते ॥१८१॥
ऐसे अनर्थ तयांचे दारी । तेथे प्रमाद पर्वताची दरी । मग यमाची ती स्वारी । तेथे अर्जुना ॥१८२॥
रागद्वेषाच्या कारणे । तयांचे अज्ञानी रमणे । भ्रमासी सत्य मानणे । घडे तेथे ॥१८३॥
ऐसे तमोगुणी होता । मन इच्छात अडकता । मनोभ्रांतीच्या हाता । सापडती ते ॥१८४॥
ऐसे तमाच्या गर्तेत पडता । विवेक तो संपता । कुशल कर्मांचा अंत होता । दुर्दशा होते ॥१८५॥
कशाला तयांची आठवण । जो नुसताच आहे शीण । वायाच ते बोलणं । त्यांच्याविषयी ॥१८६॥
जयाकारणे होईल कल्याण । आणि जाईल तो शीण । ऐसे ऐक आता वचन । सांगतो तुजला ॥१८७॥
जयाच्या अंत:करणात । आत्मज्ञान असे प्रवेशत । तेथे वैराग्य असे राहतं । स्वप्नातही ॥१८८॥
सदैव सद्भाव तयांच्या मनी । करती सर्वांची हित जोपासनी । विवेकासी खतपाणी । घालती ते ॥१८९॥
ज्ञानगंगेत नहाता । भ्रमांची होता सांगता । अनुभवती अंतर्बाह्य शांतता । सदैव ते ॥१९०॥
ऐसी तयांची स्थिती । जे धैर्याचे मेरू असती । नि आनंदाची ती भरती । अंतरी त्यांच्या ॥१९१॥
ऐसी जया प्राप्ती । ते कैवल्यासही जिंकती । आणि नांदते ती नीती । त्यांचेच ठायी ॥१९२॥
मज व्यापका जाणता । ऐसी प्रकटते शांतता । करण्या सर्वासी सहायता । धावती ते ॥१९३॥
ऐसे जे महानुभाव । जे प्रकृतीचेही दैव । ते जाणती पहा सर्व । स्वरूप माझे ॥१९४॥
ऐसे प्रेम वाढोनी । दंग रहाती ते भजनी । द्वैताची ती कहाणी । नाही तेथे ॥१९५॥
ऐसे ते मीच होऊन । करती ते माझे भजन । नवल त्यांचे सांगेन । ऐक आता ॥१९६॥
सदैव करती कीर्तन भजन । नच उरे मग प्रायश्चित्त घेणं । केले पापाचे निर्मूलन ।समूळ त्यांनी ॥१९७॥
यमदमा अवकळा आणली । तीर्थे ठायावरूनी उठविली । यमलोकीची खुंटिली । राहाटी आघवी ॥१९८॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

यम म्हणे काय यमावे । दम म्हणे कवणाते दमावे । तीर्थे म्हणती काय खावे । दोष औषधास नाही ॥१९९॥
ऐसे माझेनि नामघोषे । नाही करिती विश्वाची दुःखे । अवघे जगचि महासुखे । दुमदुमित भरले ॥२००॥
ते पहाटेवीण पाहावीत । अमृतेवीण जीवविंत । योगेवीण दावित । कैवल्य डोळा ॥२०१॥
नाही भेद राजा रंकाचा । वा लहान नि थोराचा । उत्सव तेथे आनंदाचा । सदैव अर्जुना ॥२०२॥
कुणी एकाने वैकुंठा जावे । यांनी वैकुंठच केले आघवे । ऐसे नामघोष गौरवे । धवळले विश्व ॥२०३॥
सूर्यासारखे तळपती । परि हे न अस्ता जाती । पौर्णिमेसच पूर्ण चंद्रगती । हे नाही तैसे ॥२०४॥
मेघ उदार परि वोसरे । म्हणून उपमेस न पुरे । दयाळु ज्ञानी सारे । शंकरापरी ॥२०५॥
पुण्य सहस्त्र जन्म करणे । मग माझे नाम मुखी येणे । ते नाम सदैव असणे । मुखी यांच्या ॥२०६॥
तो मी वैकुंठी नसे । एकवेळ भानुबिंबीही न दिसे । वरी योगीयांचीही मानसे । ओलांडून जाई ॥२०७॥
परि तयापाशी पांडवा । मी हारपला गिवसावा । जेथे नामघोष बरवा । करती माझा ॥२०८॥
इतके माझ्यात रंगले । देश काळासी विसरले । कीर्तन करता आले । स्वस्वरुपासी ॥२०९॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद । माझीया नामाचा निखळ प्रबंध । माझी आत्मचर्चा उदंड । नाचती गाती ॥२१०॥
ऐसे माझे ते भक्त । सतत कीर्ती माझी गात । एक होऊन चराचरांत । राहती सदा ॥२११॥
मग आणखी काही अर्जुना । जिंकण्या त्या इंद्रियांना । स्वार होवोनिया मना । साधना करती ॥२१२॥
बाहेर यमनियमांची काटी लावती । आत वज्रासनाची मुद्रा बांधती । रोधने प्राणांची गती । योग अर्जुना ॥२१३॥
साधुनी कुंडलिनी जागरण । ताब्यात घेऊन मन पवन । मनासी उन्मन । करती ते ॥२१४॥
ऐसे प्रत्याहाराद्वारे । संपवती विकार सारे । पंचेंद्रिय ती माजोरे । वठणी आणती ॥२१५॥
ऐसी धारणा ती साधून । पंचमहाभुतांसी एकवटून । चार वाचांचे थैमान । संपवती ते ॥२१६॥
जैत रे जैत म्हणत । योगाचे निशाण फडकवत । चैतन्यी एकरूप होत । साधती योग ॥२१७॥
ऐसे समाधी द्वारा । संपवून पंचभुतांचा पसारा । एकत्व पावून ईश्वरा । मुक्त होती ॥२१८॥
ऐसे हे गहन । अर्जुना माझे भजन । आता अजून मी सांगेन । जे करती दुसरे ॥२१९॥
जैसे त्या वस्त्रात । केवळ सूतच असे वसत । तैसे या चराचरांत । मीच अर्जुना ॥२२०॥
सूक्ष्म असो वा स्थूल । मीच सर्व विश्व अखिल । कालातीत आणि काल । मीच अर्जुना ॥२२१॥
लहान मोठे जे दिसते । सजीव निर्जीव जरी भासते । जे सर्वकाही अनुभवा येते । ते मीच अर्जुना ॥२२२॥
चांगले असे वा वांगले । योग्य अयोग्य जरी वाटले । जे काही अनुभवा आले । ते मीच अर्जुना ॥२२३॥
जसा नद्यांचा स्वभाव । सागराकडेच घेती धाव । तैसे सर्व अनुभव । माझेच ठायी ॥२२४॥
झाड फळांनी लगडते । मग सहज भूमीकडे झुकते । तैसे होता ज्ञान ते । येते नम्रता ॥२२५॥
ऐसे पृथकपण जावून । राहती मग विनयानं । सदैव माझ चिंतन मनन । मनी त्यांच्या ॥२२६॥
मजसी एकरूप होता । मान अभिमान गळता । मग त्यांची माझी ऐक्यता । अखंडित ॥२२७॥
अर्जुना ही श्रेष्ठ भक्ती । सांगितली मी तुजप्रती । आता जे ज्ञानमार्गी असती । ऐक तयांना ॥२२८॥
ज्ञानमार्गाची ही रीत । अर्जुना तू असे जाणत । चौथ्या त्या अध्यायात । वर्णिली होती ॥२२९॥
तेव्हा म्हणाला अर्जुन । देव असता मजला प्रसन्न । मी का नाही म्हणेन । सांगा देवा ॥२३०॥
ऐसे बोल ते ऐकून । गेला भगवंत सुखावून । मनी पावून समाधान । बोलू लागला ॥२३१॥
असुनी प्रसंग युद्धाचा । करीन वर्षाव ज्ञानाचा । तुज सारिखा भक्त साचा । लाभला मज ॥२३२॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मग म्हणाला अर्जुन । जसं चकोरासाठी चांदणं । तसं तुझं ते बोलणं । मजसाठी देवा ॥२३३॥
चकोर आपुलीया चाडे । चोच करती चंद्राकडे । तसे माझे ते साकडे । तुजला देवा ॥२३४॥
वर्षाकाळी जशी मेघानं । भागते जगाची तहान । तसं तुझं बोलणं । मजसाठी देवा ॥२३५॥
तरी बा भगवंता । सांगावे ज्ञान आता । मनी माझ्या अधिरता । दाटली असे ॥२३६॥
अर्जुनाची विनंती ऐकून । देव गेला संतोषून । मग तो उल्हासून । म्हणाला त्यासी ॥२३७॥
जी तळमळ तुझ्या मनात । तीच मजला असे बोलवत । म्हणून असे मी सांगत । ज्ञान तुजला ॥२३८॥
ऐक ज्ञानयज्ञाचे स्वरूप । मुख्य खांब आदिसंकल्प । पंचमहाभुते ती मंडप । नि पशू द्वैत अर्जुना ॥२३९॥
अज्ञान पंचमहाभुतांचा गुण । ही बुद्धि इंद्रिये आणि प्राण । या सर्वांना यज्ञात टाकून । मुक्त व्हावे ॥२४०॥
मन बुद्धिच्या कुंडात । ज्ञानाग्नी होऊ द्यावा प्रदीप्त । अवधानी समत्व धरत । ब्रह्म व्हावे ॥२४१॥
मनी विवेक धरून । अंतरी अवधान साधून । ज्ञानास उपलब्ध होणं । यज्ञ अर्जुना ॥२४२॥
प्रकटता ती ब्रह्ममयता । संपून जाई अज्ञानता । जाता तडा त्या द्वैता । प्रकटे ज्ञान ॥२४३॥
अज्ञान ते सरता । संपून जाई ज्ञेय ज्ञाता । विश्वी एकत्व पावता । मुक्ती अर्जुना ॥२४४॥
जेव्हा ज्ञान ज्ञाता ज्ञेय । हा भेद संपून जाय । विश्वात्मकतेची घोषणा होय । तेव्हा अर्जुना ॥२४५॥
जसे झोपेतून उठता । संपे स्वप्नाची भासमानता । तैसे ज्ञान प्राप्त होता । संपे द्वैत ॥२४६॥
ऐसे ब्रह्ममय होता । होई विश्वासी एकात्मता । द्वैताची ती कथा । संपून जाई ॥२४७॥
जीवपणाचा संपता आभास । उरते ब्रह्म ते निखालस । द्वैत जाता लयास । उरे भक्ती ॥२४८॥
मग विविधतेचे भास । संपून जाती ते खास । आणि एकत्वाचा वास । जिकडेतिकडे ॥२४९॥
बाहेरी भासे विविधता । परि अंतरी अनुभवी एकता । शरीर अवयवांची अभिन्नता । जैसी अर्जुना ॥२५०॥
जैसे वृक्षाच्या ठिकाणी । फांद्या पानांची उभारणी । वा त्या सूर्यापासोनि । निघती किरणे ॥२५१॥
विश्वाचं विविध भासणं । ते बा नामरुपाकारण । परि एका ब्रह्मापासून । निर्मिती त्याची ॥२५२॥
हाच बा यज्ञ ज्ञान । विश्वी एकत्व पावणं । द्वैत ते संपणं । सूत्र अर्जुना ॥२५३॥
मग तयाचे ठायी । जे जे दिसत असे काही । ते मी वाचूनी नाही । अन्य अर्जुना ॥२५४॥
जसे बुडबुड्याच्या ठिकाणी । असते केवळ एक पाणी । बुडबुड्याची ती कहाणी । पाणीच की ॥२५५॥
जसे मातीचे ते कण । तयाचे वाऱ्यासंगे उडणं । आणि पुन्हा मातीतच मिसळणं । पडता खाली ॥२५६॥
तैसे या विश्वाची कहाणी । जी भासाचीच उभारणी । ती एका ब्रह्माच्याच ठिकाणी । भासे अर्जुना ॥२५७॥
ऐसे मजसी जाणून । ब्रह्ममय ते होऊन । घडे तयांचे वर्तन । या जगती ॥२५८॥
एका सूर्याकारणे । चराचराचे होई प्रकटणे । तैसे माझीया कारणे । प्रकटे सर्व ॥२५९॥
तयाच्या त्या ज्ञाना । सीमाच नसे अर्जुना । वायू जैसा गगना । सर्वांगी असे ॥२६०॥
मी जेवढा आघवा । जर आलो अंतरी अनुभवा । मग न करता पांडवा । भजन झाले ॥२६१॥
एऱ्हवी सकळ मीच आहे । कोण मज उपासत नोहे । सर्वांचा भार मीच वाहे । अखंडित ॥२६२॥
जे अर्जुना बा जागले । ज्ञानयज्ञी मज उपासले । तयांचे कल्याण झाले । आपोआप ॥२६३॥
येथे जे जे काही असे । ते सर्व मजठायीच असे । परि अज्ञानी न जाणत असे । स्वरूप माझे ॥२६४॥
ऐसी विश्वासी एकात्मता अनुभवणे । तेचि बा ज्ञान होणे । मग एकत्वाने राहणे । घडे येथे ॥२६५॥
येथे जे जे कर्म घडते । ते मजपासूनच प्रकटते । विश्व हे होते जाते । मजठायी ॥२६६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०